दैनिक
माणदूत एक्सप्रेस
गुरु

# वनस्पतीशास्त्र विभाग विज्ञान महाविद्यालय सांगोला आयोजित आंतरराष्ट्रीय परिषद संपन्न

सांगोला(प्रतिनिधी):-विज्ञान महाविद्यालय सांगोला (वनस्पतीशास्त्र विभाग),इंडियन वुमन सायंटिस्ट असोसिएशन कोल्हापूर शाखा व इतर काही महाविद्यालये यांच्या संयुक्त विद्यमाने एक दिवशीय आंतरविद्याशाखीय आंतरराष्ट्रीय परिषद (ऑन लाइन) अतिशय उत्तम प्रकारे संपन्न झाली.

'नर्चर द नेचर टू स्ट्रेन्दन द फ्युचर'(उज्वल भविष्यासाठी निसर्ग संगोपन) या विषयावरती ही कार्यशाळा घेण्यात आली. या कार्यशाळेची मुख्य संकल्पना 'महिला आणि पर्यावरण' अशी होती. या कार्यशाळेचे उद्घाटन कुंडीतील वडाच्या झाडाला पाणी घालून करण्यात आले. उद्घाटन कार्यक्रमाच्या अध्यक्षा डॉ. रिटा, अध्यक्षा इंडियन वुमन सायंटिस्ट असोसिएशन, (मुंबई) यांनी कार्यशाळेचे उद्घाटन झाल्याचे जाहीर केले. परिषदेच्या सुरुवातीला विज्ञान महाविद्यालयातर्फे वनस्पतीशास्त्र विभागाच्या प्राध्यापिका डॉ. सौ. सीमा गायकवाड (सह-संयोजक- इंडियन वुमन सायंटिस्ट असोसिएशन, कोल्हापूर शाखा) यांनी महाविद्यालयाची भूमिका स्पष्ट केली. या परिषदेत 'महिला व पर्यावरणाच्या सामाजिक फायद्यासाठी अंतराळ तंत्रज्ञानाचा उपयोग' यावर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील इस्रोच्या अंतराळ तंत्रज्ञान कक्ष येथे चेअर प्रोफेसर डॉ. दीप्ती देवबागकर, तर 'महिला आणि पर्यावरणाच्या शाश्वत विकासाचे सामाजिक व आर्थिक पैलू' यावर पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूर च्या कुलगुरू डॉ.मृणालिनी फडणवीस यांनी मांडणी केली. तर 'ग्रामीण महिलांसाठी नैसर्गिक संसाधने आणि गुंतवणूक' यावर रिझर्व बँकेच्या डेप्युटी गव्हर्नर उषा थोरात, तर 'कृषी व औद्योगिक कचरा मुल्यमापन चक्रीय अर्थव्यवस्थेच्या दिशेने वाटचाल' यावर कोडोन बायोसायान्स च्या डॉ. अर्चना ठाकूर यांनी मांडणी केली. तर 'जागतिक बाजारपेठेतील बहुचर्चित पिकावर अंतर विद्याशखीय दृष्टिकोनातून नवीन संधी ची ओळख' यावर डॉ. मनीषा गजे भोसले यांनी यूके (लंडन) येथून व डॉ.कविता माथूर (नोर्थ कॅरोलीना स्टेट युनिव्हर्सिटी, अमेरिका) यांनी इव्हॅल्युएशन ऑफ अँटीमायक्रोबियल अँड अँटीव्हायरल प्रॉपर्टीज ऑफ टेक्सटाइल सरफेस या विषयावरती आपली उत्कृष्ट मांडणी केली.

महिला व पर्यावरण व्यवस्थापन भूमिका, संबंधित पर्यावरणासह सामाजिक फायद्यासाठी अवकाश तंत्रज्ञान, तटीय जैवविविधता संवर्धन, पाणी जिर्णोधार, निसर्गाचे पालन-पोषण करण्यासाठी महिलांची सामाजिक पर्यावरणीय भूमिका, नैसर्गिक संशोधन संसाधन व्यवस्थापनाच्या संदर्भात अर्थशास्त्र, नैसर्गिक साधन संपत्तीवर अवलंबून उपजीविका पद्धती, सेंद्रिय शेती करणाऱ्या महिला, महिला शाश्वत निसर्ग उभारणीत भूमिका आदी विषयांवर सुमारे २० संशोधक सहभागींनी आपले पेपर सादर केले. या सत्रासाठी अध्यक्ष म्हणून डॉ. निरंजना चव्हाण, डॉ.धनश्री पाटील, डॉ. ललीता धारेश्वर यांनी काम पाहिले तर रेपोटीयर म्हणून डॉ. अंजली साळवी यांनी तर पेपर सादीकरण सत्रात डॉ. पद्मश्री आवटे, डॉ. मृणालिनी देसाई यांनी काम पाहिले. इंडियन वुमन सायंटिस्ट असोसिएशन च्या संयोजक दिपाली तायवडे-पाटील यांनी सर्वांचे आभार मानले संपूर्ण कार्यक्रमाचे सुत्रसंचलन डॉ. अनुराधा सामंत यांनी केले.

टेक्निकल को-ऑर्डिनेटर म्हणून वनस्पतिशास्त्र विभागप्रमुख डॉ. राजेंद्र सूर्यवंशी व नितीन कवठणकर यांनी काम पाहिले. या परिषदेसाठी जवळजवळ १८० सहभागींनी आपला सहभाग नोंदवला होता. या परिषदेनिमित्त आलेल्या संशोधक विद्यार्थ्यांचे निबंध आय. एस. एस. एन. नंबर व उत्तम इम्पॅक्ट फॅक्टर असलेल्या आंतरराष्ट्रीय जर्नल मध्ये प्रसिद्ध केले जाणार आहेत.

या आंतरराष्ट्रीय परिषदेचा एक भाग म्हणून दि. ८ मार्च २०२२ रोजी जागतिक महिला दिनानिमित्त सेंद्रिय शेती, पर्यावरण व निसर्ग संवर्धन या क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या विविध महिलांचा सत्कार समारंभ महाविद्यालयामध्ये आयोजित करण्यात आला होता. सेंद्रिय शेती बरोबरच मोरिंगा (शेवगा) पावडर निर्यात करणाऱ्या सारिका ताई धाडगे, कृषिरत्न पुरस्कार मिळालेल्या नितावाई ढोबळे व वनविभागामध्ये काम करून निसर्ग संवर्धन करीत असलेल्या वनितावाई इंगोले यांना सन्मानित करण्यात आले होते. या आंतरराष्ट्रीय परिषदेच्या उत्कृष्ट आयोजनाबद्दल संस्था सचिव मा. विठ्ठलराव शिंदे व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रघुनाथ फुले यांनी वनस्पती शास्त्र विभागाचे कौतुक केले केले. या परिषदेच्या यशस्वीतेसाठी वनस्पती शास्त्र विभागाचे विभाग प्रमुख डॉ. राजेंद्र सूर्यवंशी, डॉ. सीमा गायकवाड, प्रा. मारुती हाके व श्री. वसंत घुसाळे यांनी परिश्रम घेतले.

Scanned by CamScanner




Scanned by CamScanner




Scanned by CamScanner